दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ३१ । मंगळवार १० नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com



अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

ऐन दिवाळीत बळीराजा रस्त्यावर!

- ऊसाला चार हजारांचा भाव मिळेपर्यंत राहुरीत बेमुदत चक्का जाम
- नगर-मनमाड महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा; अनेक शेतकरी संघटना आंदोलनात सहभागी

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

ऐन दिवाळीच्या सणातही ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडल्याने बळीराजा आता आक्रमक झाला आहे. ऊसाला प्रतिटन चार हजार रुपये भाव जाहीर करावा, या मागणीसाठी सोमवारी राहुरी येथे नगर-मनमाड महामार्गावर शेतकरी संघटनांनी बेमुदत चक्का जाम आंदोलन सुरू केले. कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर सुरू असलेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक



पूर्णपणे विस्कळीत झाली असून दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

सोमवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास सुरू झालेले आंदोलन अद्यापही सुरूच आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखानदारांनी ऊसदर जाहीर केले असताना अहिल्यानगर जिल्ह्यातील कारखानदारांनी मात्र अद्याप भाव जाहीर केलेला नाही. शेतकऱ्यांचा ऊस गाळपासाठी घेतला, मात्र दिवाळीत एक रुपयाही दिला नाही. कारखानदारांच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांची दिवाळी काळी झाल्याचा आरोप शेतकरी सेनेचे (पान ४ वर)

फटाक्यांच्या पैशांच्या वादातून तरुणाचा बळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : फटाक्यांच्या पैशांच्या वादातून सुरू झालेल्या किरकोळ भांडणाचे रूपांतर थेट हत्येत झाल्याची धक्कादायक घटना श्रीरामपूर शहरातील टिळकनगर परिसरात घडली. स्विफ्ट डिझायर कार अंगावर घालून शफी नवाब पठाण यांची हत्या केल्याचा आरोप असून, या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. तलवार, कुऱ्हाड आणि चाकू घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या आरोपींपैकी दोन जणांना श्रीरामपूर शहर पोलिसांनी तातडीने अटक केली असून, अन्य आरोपींचा शोध सुरू आहे.(पान ४ वर)

येडशीमध्ये अग्नितांडव

घराला लागलेल्या आगीत सहा जणांचा गुदमरुन मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

धाराशिव : येडशी येथे मध्यरात्री किराणा दुकान आणि त्यावर असलेल्या करंडे कुटुंबीयांच्या घराला भीषण आग लागून सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर एकजण बचावला आहे.

अचानक आग लागल्याने घरात धुराचे लोट पसरले. बाहेर पडता न आल्याने सहा जणांचा गुदमरून मृत्यू झाला.उत्तम त्रिंबक करंडे (वय ७५ वर्षे) - आजोबा, चंद्रकला उत्तम करंडे (वय ७० वर्षे) - आजी, गोविंद उत्तम करंडे (वय ४७ वर्षे) - मुलगा, ज्योती गोविंद करंडे (वय ४२ वर्षे) - सून, गायत्री गोविंद करंडे (वय १६ वर्षे) - नात, सिद्धी गोविंद करंडे (वय १५ वर्षे) - नात, अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. या भीषण आगीतून कुटुंबातील कृष्णा गोविंद करंडे (वय १८ वर्षे) हा एकच तरुण सुखरूप बचावला आहे. गावकरी आणि अग्निशमन दलाने आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मृतांना धाराशिव शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सुट्टीची सूचना

दिवाळी पाडवा आणि भाऊबीज निमित्त दैनिक राष्ट्र सह्याद्री कार्यालयास १० व ११ नोव्हेंबर २०२६ रोजी सुट्टी राहील. त्यामुळे ११ व १२ नोव्हेंबर २०२६ रोजी चा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार आणि हितचिंतक यांनी नोंद घ्यावी. सर्वांना दिवाळी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा... संपादक

दिवाळीच्या रात्री श्रीरामपूरमध्ये दगडफेक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कार पेटवली : पोलिसांची धडक कारवाई, आठ जण अटकेत

श्रीरामपूर : दिवाळीच्या उत्साहाला गोंधवणी रोडवरील हिंसक घटनेने गालबोट लागले. दोन परस्परविरोधी गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर दगडफेक, मारहाण आणि चारचाकी वाहन जाळण्याच्या प्रकारात झाले. दत्त मंदिराजवळ सोमवारी मध्यरात्री झालेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. श्रीरामपूर शहर पोलिसांनी तातडीने हालचाल करत दोन्ही गटांतील आठ आरोपींना अटक केली असून, अन्य आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (९ नोव्हेंबर) रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास गोंधवणी रोडवरील दत्त मंदिर परिसरात हा प्रकार घडला. फिर्यादी व त्याचे मित्र दिवाळीचे फटाके फोडून घरी परतत असताना भरधाव वेगाने आलेल्या शेवरलेट कारचा रस्त्यालगत ठेवलेल्या सिमेंटच्या गोण्यांना धक्का लागला. यावरून कारमधील व्यक्तींशी वाद झाला. या वादातून मोसीन मुश्ताक शेख, अरबाज शेख, अल्तमश शेख व त्यांच्या साथीदारांनी लाकडी दांडक्यांनी मारहाण करून दगडफेक केल्याचा आरोप एका गटाने केला आहे.दरम्यान, दुसऱ्या गटाने दिलेल्या फिर्यादीत कारला झालेल्या (पान ४ वर)

नोटाबंदीला १० वर्षे... जिल्हा बँकेचे ११.७० कोटी अजूनही तिजोरीत बंद!

- जुन्या नोटांचा गुंता कायम; सर्वोच्च न्यायालयातील लढाईनंतरही प्रश्न अनुत्तरित, कोट्यवधींचा निधी वापराविना पडून

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : नोटाबंदीच्या निर्णयाला दहा वर्षांचा काळ उलटत आला, तरी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तिजोरीत अडकलेल्या ११ कोटी ७० लाख रुपयांच्या जुन्या नोटांचा प्रश्न अद्याप निकाली निघालेला नाही. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी केंद्र सरकारने ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय घेतला (पान ४ वर)

शेतकऱ्यांच्या पैशांचा प्रश्न ऐरणीवर

एकीकडे जिल्हा बँक शेतकऱ्यांना पीककर्ज, सहकारी संस्थांना आर्थिक पाठबळ आणि विविध बँकिंग सेवा देण्याची जबाबदारी पार पाडत असताना दुसरीकडे ११.७० कोटींचा निधी दशकभरापासून अडकून पडला आहे. हा केवळ बँकेच्या ताळेबंदातील आकड्याचा प्रश्न नसून सहकार व्यवस्थेच्या आर्थिक हिताचा विषय आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून अहमदनगर जिल्हा बँकेच्या अडकलेल्या रकमेचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी सहकार क्षेत्रातून होत आहे.


ॲड.श्री.प्रतापराव ढाकणे


सौ.प्रभावतीताई प्रतापराव ढाकणे


श्री.ऋषीकेष प्रतापराव ढाकणे

मजूर शेतकरी आणि शोषित समाजाचा
हक्काचा बुलंद आवाज, माजी केंद्रीय राज्यमंत्री

स्व.बबनरावजी ढाकणे साहेब

यांच्या जयंती निमित्त त्यांच्या महान कार्यास व स्मृतीस

।। विनम्र अभिवादन ।।

।। अभिवादक ।।

मा.किरण शेलार कार्यकारी संचालक
मा.माधव काटे व्हा.चेअरमन
मा.ऋषीकेष ढाकणे चेअरमन

सर्व संचालक मंडळ, ऊस उत्पादक सभासद, आणि अधिकारी, कर्मचारी वृंद
संघर्ष योद्धा बबनरावजी ढाकणे, श्री.केदारेश्वर सहकारी
साखर कारखाना, सुमननगर (बोधेगांव) ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर

भावपूर्ण श्रध्दांजली



क्षणो क्षणी आमच्या मनी तुमची आहे आठवण हीच आमच्या आयुष्यातील अनमोल साठवण...

शिर्डी शहराच्या प्रथम महिला नगराध्यक्षा व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या माजी विश्वस्त

कै.सौ.सुमित्रा (काकी) कैलासबापू कोते पा.

(स्वर्गवास - सोमवार दि.०२/११/२०२६)

यांच्या दुःखद निधनाने शिर्डी शहराच्या सामाजिक व सार्वजनिक जीवनातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व कोते परिवारास दुःखातून सावरण्याचे बळ देवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

।। दशक्रिया विधी ।।

बुधवार दि.११/११/२०२६ रोजी सकाळी ०८.०० वा.
ठिकाण : कैलास बापू कोते पा. यांच्या राहत्या घरी, नगर-मनमाड रोड, जनेश्वर मंदिरा शेजारी, शिर्डी येथे होईल.

शोकाकुल

नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक व कर्मचारी वृंद
शिर्डी नगरपरिषद, शिर्डी

संदीप पाटील वराळ गोरगरीबांची दिवाळीचा आनंद हजारो कुटुंबांना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

निघोज : संदीप पाटील वराळ गोरगरीबांची दिवाळी हा सामाजिक उपक्रम संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन व निघोज ग्रामस्थ माध्यमातून सोमवार दि.९ रोजी कपिलेश्वर मंगल कार्यालयात शिरुर तालुक्याचे माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांच्या हस्ते संपन्न झाला.

संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम दरवर्षी दिवाळीमध्ये संपन्न होत असतो गेली तेरा वर्षापूर्वी माजी सरपंच व माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांनी हा सामाजिक उपक्रम सुरू केला होता. त्यांच्या अनुपस्थितीत हा उपक्रम सुरू ठेवण्याचे काम संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आजपर्यंत सुरू ठेवला आहे. सोमवार



दि.९ रोजी झालेल्या कार्यक्रमात जवळपास ११०० कुटुंबाला साडी तसेच मिठाई वाटप करण्यात आले. तसेच यावेळी सर्व पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. तसेच माजी आमदार गावडे व कन्हैयाचे सर्वे सर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांचा सत्कार यावेळी वराळ भावकीचे कारभारी बजरंग वराळ व पांडुरंग तात्या वराळ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

माजी आमदार पोपटराव गावडे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांनी गावचे सरपंच व सोसायटीचे चेअरमन असताना गोरगरीबांची जाणीव ठेऊन समाजाभिमुख विकास करीत सेवाभाव केला तेच काम पुढे पंचायत समितीचे माजी सदस्य मच्छिंद्र वराळ पाटील, माजी सरपंच व बाजार समितीचे माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांनी सुरू ठेवला. संदीप पाटील वराळ यांनी गोरगरीबांच्या दिवाळीसाठी सर्वसामान्य जनतेच्या घरात दिवाळीचा आनंद मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले. तेच काम आज संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरू ठेवले असून हाच सेवाभाव त्यांना आशिर्वादरुपी जनसेवेची महती वाढवीणारा ठरणार आहे. सचिन पाटील यांच्या माध्यमातून आज निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा आशीर्वाद सातत्याने वराळ कुटुंबाला असल्याने कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली असून सचिन पाटील यांचे राजकीय भवितव्य उज्वल आहे. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी सांगितले की संदीप पाटील गोरगरीबांची दिवाळी हा सामाजिक उपक्रम गेली १३ वर्षांपासून सुरू आहे. आजोबा सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील, वडील, मच्छिंद्र वराळ पाटील व बंधू संदीप पाटील वराळ यांनी जनसेवेच्या माध्यमातून समाजपयोगी काम केले. हा उपक्रम संदीप पाटील वराळ यांनी सुरू केला. जेणेकरून गोरगरीबांच्या घरात दिवाळी साजरी करता येईल लोकसहभागातून संपन्न होणाऱ्या या समाजसेवी उपक्रमात ग्रामस्थ व पत्रकार सहभागी होऊन या कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले असून यावर्षी दुष्काळी परिस्थिती आहे मात्र गोरगरीब समाजासाठी आम्ही सर्व संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन माध्यमातून पाणी असो किंवा जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न मार्गी लावू यासाठी राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते सर, माजी खासदार डॉ सुजय दादा विखे पाटील यांचे पाठबळ असून दुष्काळी परिस्थितीत संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही वराळ पाटील यांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक फौंडेशनचे मार्गदर्शक सुनिल पवार यांनी केले. यावेळी शीहरी महाराज पवार, साहित्यिक नाना ढवळे, शिवनेरी वितरीकास्तरीय पाणी वापर शिखर संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव डेरे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, पंचायत समितीचे माजी सदस्य दिनेश बाबर, भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज कारखिले , शिरुर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय बारहाते आदिंचे भाषने झाली. या कार्यक्रमास निघोज पंचक्रोशीतील विविध संस्थांचे पदाधिकारी, संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद ठुबे यांनी केले. शेवटी निलेश घोडे यांनी आभार मानले.

कन्हैयाचा श्रीखंड घरोघरी

संदीप पाटील वराळ गोरगरीबांची दिवाळी या सामाजिक उपक्रमांसाठी लोकसहभागातून वराळ कुटुंबाचे हितचिंतक व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात आर्थिक देणगी देतात. गेली १३ वर्षांपासून कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शांताराम मामा लंके हे प्रत्येक वर्षी यासाठी श्रीखंड देत असतात यावर्षी सुद्धा कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांनी १०० किलो श्रीखंड देऊन या उपक्रमात योगदान दिले आहे. जवळपास ११०० कुटुंबाला या श्रीखंडाचा तसेच साडी व मिठाई याचा लाभ झाला आहे. ग्रामस्थांनी या समाजसेवी उपक्रमाचे कौतुक केले आहे.

माळवाडगावच्या वीज समस्येला मिळणार दिलासा

चार नवीन ट्रान्सफार्मरचे लोकार्पण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : शेतीपंपांना कमी दाबाने होणारा वीजपुरवठा, वारंवार खंडित होणारी वीज आणि वाढत्या वीजभारामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय म्हणून माळवाडगाव येथे एक सिंगल फेज आणि तीन थ्री फेज असे एकूण चार नवीन वीज रोहित्र कार्यान्वित करण्यात आले. जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निधीतून आणि ज्येष्ठ नेते तथा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन गिरीधर आसने व भाजपचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे यांच्या प्रयत्नांतून ही सुविधा उपलब्ध झाली आहे. लक्ष्मण आसने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास गिरीधर आसने, बाबासाहेब चिडे आणि भाजपचे तालुका उपाध्यक्ष डॉ. शंकरराव मुठे उपस्थित होते. नवीन रोहित्रांमुळे जुन्या रोहित्रांवरील अतिरिक्त भार कमी होऊन शेतीपंपांना योग्य दाबाने वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. तसेच घरगुती वीजग्राहकांनाही सुरळीत वीजपुरवठ्याचा लाभ मिळणार आहे. यावेळी बाबासाहेब चिडे म्हणाले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माळवाडगावमध्ये आठ ते दहा कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. गावाच्या विकासासाठी यापुढेही निधी मिळविण्याचा पाठपुरावा सुरू



राहील. गिरीधर आसने यांनी सांगितले की, भोकर आणि हरेगाव उपकेंद्रांच्या माध्यमातून परिसरातील वीज समस्येवर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नवीन रोहित्रांमुळे शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळेल. डॉ. शंकरराव मुठे यांनीही या सुविधेमुळे शेती आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सक्षम होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमास ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन रवींद्र शिंदे यांनी केले, तर प्रास्ताविक नानासाहेब आसने यांनी केले.

बदलीच्या वादातून मुख्याध्यापक गुजरे यांच्या आत्मदहन आंदोलनाला तूर्त स्थगिती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : अन्यायकारक बदली आणि जून २०२६ पासून वेतन बंद असल्याच्या निषेधार्थ आत्मदहनाचा इशारा देणारे श्री संत गाडगे महाराज आश्रमशाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गुजरे यांनी तूर्त आत्मदहन आंदोलन स्थगित केले आहे. संस्थेचे सचिव विश्वनाथ नाचवणे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर काही अटी व मागण्यांच्या पूर्ततेच्या आश्वासनावर त्यांनी हा निर्णय घेतला. मात्र, मागण्या मान्य न झाल्यास ६ डिसेंबर रोजी पुन्हा आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.गुजरे यांनी आपल्या बदलीचा पुनर्विचार करण्यासाठी संस्थेकडे वारंवार पत्रव्यवहार केला होता. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनीही संस्थेला बदलीबाबत पुनर्विचार करण्याचे निर्देश दिल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यानुसार २६ सप्टेंबर रोजी संस्थेला टपाल, ई-मेल आणि व्हॉट्सॲपडरे विनंती अर्ज पाठवूनही सकारात्मक निर्णय झाला नाही. त्यानंतर २१ ऑक्टोबर रोजी आयुक्तांकडे अपील केले, तर २८ ऑक्टोबर रोजी संस्थेला पुन्हा निवेदन दिले.जूनपासून वेतन बंद असल्याने कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले असून, पुण्यात शिक्षण घेणाऱ्या दोन्ही मुलांची शैक्षणिक फी भरता न आल्याने त्यांचे शिक्षण थांबले आहे. तसेच घेतलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी कायदेशीर नोटिसा मिळाल्याचे गुजरे यांनी सांगितले.

भगवंत चिंतनातूनच मिळतो नित्य दिवाळीचा आनंद : महंत उद्धव महाराज



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा बुद्रुक शिवारातील सुरेगाव रस्त्यावर असलेल्या सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमातील मंदिराचा १२ वा वर्धापनदिन सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी गुरुवर्य ह.भ.प. महंत उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांनी भगवंत चिंतन आणि नामस्मरणातूनच नित्य दिवाळीचा आनंद अनुभवता येतो, असे प्रतिपादन केले. 'दसरा दिवाळी तोचि आम्हा सण, सखे संतजन भेटतील' या अभंगाचे निरूपण करताना महाराज म्हणाले की, सज्जनांच्या भेटीत जीवनाचा खरा आनंद असतो. सण आणि उत्सवांच्या माध्यमातून समाज एकत्र येतो, विचारांची देवाणघेवाण होते आणि संत-महात्म्यांच्या सहवासातून चांगले विचार मिळतात. समाजातील अडचणीत असलेल्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहून त्याचे दुःख दूर करणे हाच खरा पुरुषार्थ आहे. तसेच प्रपंचात पैसा खर्च करताना योग्य वेळ आणि योग्य ठिकाण यांचा विचार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

वर्धापनदिनानिमित्त पहाटे काकडा भजन, सकाळी देवतांचे पूजन, दुपारी भजनसेवा, सायंकाळी हरिपाठ आणि त्यानंतर महाराजांची संगीत प्रवचनसेवा झाली. प्रवचनानंतर विविध सेवा देणाऱ्या दात्यांचा सन्मान करण्यात आला. आश्रमाचे शिक्षक बाळासाहेब झिने यांनी सूत्रसंचालन केले, तर महेश गवळी यांनी आभार मानले. यावेळी झालेल्या वर्धापनदिन सोहळ्यास संतसेवेकरी विष्णुपंत ठोसर भाऊसाहेब,बत्तासे, गणेश डोंगरे, सुभाष गवांदे, संतोष थोरात, ग्राम अधिकारी ज्ञानदेव शिंदे, गोरख पंचमेढे, अक्षय फोपसे, पसायदान आनंदवन परिवार, रोकडेश्वर भजनी मंडळ, खंबाळा यांच्यावतीने वेगवेगळ्या प्रकारची सेवा देण्यात आली.

विद्यापीठाच्या तंत्रज्ञानातून तुरीच्या उत्पादनात भरघोस वाढ शक्य : डॉ. चांगदेव वायाळ

राहुरी : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेले सुधारित तंत्रज्ञान आणि शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन घेऊन तुरीचे लागवडीपासून काढणीपर्यंत योग्य व्यवस्थापन केल्यास उत्पादनात भरघोस वाढ मिळू शकते, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे वरिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. चांगदेव वायाळ यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मदिनाच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त तसेच 'खेत बचाओ अभियान' आणि 'विद्यापीठ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' या उपक्रमांतर्गत विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील कुंभारगाव व पोटेगाव येथील पाणी फाउंडेशनच्या शेतकरी गटांच्या तुरीच्या प्रक्षेत्रांना भेट दिली. यावेळी ते बोलत होते. माजी कडधान्य पैदासकार डॉ. नंदकुमार कुटे उपस्थित होते.

डॉ. वायाळ म्हणाले, या भागातील शेतकऱ्यांना पारंपरिक पद्धतीने एकरी पाच ते सहा क्विंटल तुरीचे उत्पादन मिळत होते. मात्र, पाणी फाउंडेशनच्या फार्मर कप डिजिटल शेतीशाळेच्या माध्यमातून विद्यापीठाचे तंत्रज्ञान आणि शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन मिळाल्याने केवळ दोन किलो बियाण्यांचा वापर करून एकरी १४ क्विंटलपेक्षा अधिक उत्पादन घेणे शक्य झाले आहे. डिजिटल शेतीशाळेडरे शेतकऱ्यांना सातत्याने मार्गदर्शन केले जात असून, त्याचा सकारात्मक परिणाम दिसत आहे.डॉ. कुटे यांनीही सुधारित तंत्रज्ञानाच्या वापरामुळे तुरीच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याचे सांगितले. यावेळी महिला शेतकरी गटांच्या प्रतिनिधींनी मनोगत व्यक्त केले. शास्त्रज्ञांनी महिला शेतकऱ्यांच्या तुरीच्या प्रक्षेत्रांची पाहणी करून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन, सूत्रसंचालन व आभार महेंद्र देशमुख यांनी मानले. यावेळी दोन्ही गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जेष्ठ नेते यशवंतराव गडाख यांच्याकडून ऊसतोडणी कामगारांना साड्या वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : सर्वत्र दिवाळीचा सण आनंदात आणि उत्साहात साजरा होत असताना साखर कारखान्यांची धुराडी पेटलेली असल्याने ऊसतोडणी कामगार मात्र आपल्या कुटुंबासह ऊसाच्या फडातच दिवाळी साजरी करत असतात. वर्षानुवर्षे दिवाळीच्या सणातही ऊसतोडणीचे कष्टाचे काम करणाऱ्या या कामगारांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण व्हावेत, त्यांच्या कुटुंबीयांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा, या भावनेतून ज्येष्ठ नेते, माजी खासदार तथा ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांनी यंदाही ऊसतोडणी कामगारांसोबत दिवाळी साजरी करत त्यांचा सण गोड केला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सोनई परिसरात ऊसतोडणीसाठी आलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांची यशवंतराव गडाख यांनी मळ्यात जाऊन भेट घेतली. यावेळी कामगार कुटुंबातील महिलांना साड्या, लहान मुलांना रोख रक्कम तसेच दिवाळीची मिठाई भेट देण्यात आली. अचानक मिळालेल्या या प्रेमाच्या भेटीने ऊसतोडणी कामगारांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. याप्रसंगी बोलताना माजी खा. यशवंतराव गडाख म्हणाले की आपण सर्वजण दिवाळीचा सण आनंदाने साजरा करत असताना साखरेसाठी लागणारा ऊस तोडण्यासाठी ऊसतोडणी कामगार मात्र कुटुंबासह शेतात कष्ट करत असतात. त्यांच्या चिमुकल्यांची आणि कुटुंबीयांची दिवाळीही आनंदात साजरी झाली पाहिजे. आपण दिवाळी साजरी करताना या कष्टकरी बांधवांचाही आनंदात सहभाग असावा, ही भावना मनाशी बाळगून दरवर्षी त्यांच्यासोबत



दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न करतो. यावेळी शारदाताई गडाख, पंचायत समितीच्या माजी सभापती सुनीताताई गडाख, अर्थ व पशुसंवर्धन समितीचे सभापती सुनीलराव गडाख, मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख, उषाताई गडाख, जयश्रीताई गडाख आदी उपस्थित होते.

दुष्काळग्रस्त भागांत शिवसेनेच्या वतीनेही पाणी टँकर सुरू करणार : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक दुष्काळाच्या गंभीर संकटाचा सामना करीत आहेत. पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना दिवाळीचा सणही आनंदात साजरा करता येत नाही. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आम्ही दिवाळी साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. तालुक्यातील टंचाईग्रस्त भागांत शासनाच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू होतीलच; मात्र शिवसेनेच्या वतीनेही आवश्यक त्या ठिकाणी पाण्याचे टँकर सुरू करण्यात येतील, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली. दिवाळीनिमित्त शिवसेना महायुती संपर्क कार्यालयात आमदार अमोल खताळ पाटील आणि आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आले. त्यानंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, दुष्काळामुळे अनेक भागांतील नागरिकांना सण साजरा



करणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत आपण स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी झालो. लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर कुटुंबातील सदस्य म्हणून शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली. त्यांच्या अडचणी समजून घेऊन संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे ही आपली जबाबदारी आहे. तालुक्यातील दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी वृक्षसंवर्धनासह जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे लागणार आहे. पावसाचे पाणी अडवून त्याचे योग्य नियोजन करणे, भूजलपातळी वाढविणे आणि जलसंधारणाची कामे हाती घेणे आवश्यक आहे. तसेच जनावरांसाठी चारा, विहिरींचे पुनर्भरण आणि शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पाणीटंचाईसह दुष्काळी उपाययोजनांचा प्रशासनाकडून दररोज आढावा घेतला जात असून, या संकटात आपण जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, असा विश्वासही आ. खताळ यांनी व्यक्त केला.

पुणे-अहिल्यानगर महामार्गालगत अनोळखी मृतदेह आढळला

कवठे येमाई : - पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील बोऱ्हाडेमळा, न्हावरा फाटा परिसरात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शिरूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे साडेसात वाजण्याच्या सुमारास न्हावरा फाटा येथील लक्ष्मी मार्ट किराणा दुकाना शेजारी महामार्गालगत एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती दुकानमालक रितेश एकनाथ आवटे यांना मिळाली. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता संबंधित व्यक्ती कोणतीही हालचाल करीत नसल्याचे दिसून आले. त्यांनी तत्काळ डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच शिरूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित इसमाला खासगी रुग्णवाहिकेडरे ग्रामीण रुग्णालय, शिरूर येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती रात्री ९:४० वाजण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

कोपरगावच्या जलसंधारणासाठी गावनिहाय आराखडा तयार करावा : आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव - पर्जन्यछायेच्या प्रदेशात असलेल्या कोपरगाव तालुक्यात कमी व अनियमित पर्जन्यमान, भूजल पातळीत होणारी घट आणि सिंचनाच्या मर्यादित सुविधा यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रत्येक गावाचा स्वतंत्र गावनिहाय मृद व जलसंधारण विकास आराखडा तयार करून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, असे साकडे आ. विवेक भैय्या कोल्हे यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांना घातले आहे.

सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्यास मंत्री संजय राठोड यांनी ६ नोव्हेंबर रोजी भेट दिली. यावेळी त्यांनी ऊसतोड मजुरांसमवेत दिवाळी साजरी केली. याप्रसंगी आ. कोल्हे यांनी त्यांना यासंदर्भातील निवेदन सादर केले. आ. कोल्हे यांच्या निवेदनाची दखल घेत मंत्री संजय राठोड यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. कोपरगाव तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांसाठी गावनिहाय आराखडा तयार करण्याच्या मागणीसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. संबंधित विभागाच्या माध्यमातून प्रस्तावित कामांचा आढावा घेऊन आवश्यक ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.



निवेदनात आ. कोल्हे यांनी कोपरगाव तालुक्यातील पाणीटंचाई आणि जलसंधारणाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. यावर्षी अत्यल्प पर्जन्यमानामुळे कोपरगाव तालुक्याचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश झाला आहे. तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये कमी व अनियमित पाऊस, भूजल पातळीत सातत्याने होणारी घट, पाण्याचा अपुरा साठा आणि शेतीसाठी सिंचनाच्या मर्यादित सुविधा यामुळे शेती व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे. कोपरगाव तालुक्यातील प्रत्येक गावाची भौगोलिक परिस्थिती, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र गावनिहाय मृद व जलसंधारण विकास आराखडा तयार करावा. या आराखड्यातील प्रस्तावित कामांना मंजुरी देऊन त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. यासाठी संबंधित विभागाला आपल्या स्तरावरून तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी आ. विवेक भैय्या कोल्हे यांनी निवेदनाडरे केली आहे.

शेतकरीहित आणि सहकाराशी बांधिलकी कायम ठेवून उद्योगसमूहाची यशस्वी वाटचाल सुरूच राहील : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांमध्ये लक्ष्मीपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कारखाना व उद्योगसमूहाचे आधारस्तंभ माजी आ. अशोकराव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार आशुतोष काळे व त्यांच्या सुविद्य पत्नी, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे यांच्या हस्ते कारखाना व गौतम सहकारी बँकेत विधिवत लक्ष्मीपूजन करण्यात आले. तसेच आसवनी विभागात कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे व त्यांच्या पत्नी सौ.चंद्रकलाताई कोळपे, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीत कार्यकारी संचालक दौलतराव मोरे व त्यांच्या पत्नी सौ.सुनंदाताई मोरे, तर पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार पतसंस्थेत संचालक सुदामराव वाबळे व त्यांच्या पत्नी सौ.शोभाताई वाबळे यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आले. यावेळी आ. आशुतोष काळे म्हणाले की, कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी घालून दिलेल्या सहकार, शेतकरीहित आणि सामाजिक बांधिलकीच्या आदर्श विचारांवर माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना व संलग्न उद्योग समूहाची यशस्वी वाटचाल सुरू आहे, ही समाधानाची बाब आहे. कारखाना आणि संलग्न संस्थांच्या प्रगतीत शेतकरी, सभासद, कामगार आणि कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान असून त्यांच्या विश्वासाच्या बळावरच उद्योगसमूहाने प्रगतीची वाटचाल कायम ठेवली आहे. आगामी काळातही शेतकऱ्यांचे हित जपत कारखान्याची आर्थिक घडी अधिक मजबूत करण्यासाठी आणि संस्थांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याची त्यांनी ग्वाही दिली. चालू वर्षी एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा परिणाम शेती आणि पर्यायाने साखर उद्योगावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील वर्ष आव्हानात्मक ठरू शकते, अशी चिंता व्यक्त करून ते म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी आणि कारखान्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून या संकटावर मात करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

माणुसकीचा वारसा जपणारे नेतृत्व...

कै. सौ. सुमित्रा काकी कैलास बापू कोते पाटील!

शिर्डीच्या प्रथम महिला नगराध्यक्षा, श्री साईबाबा संस्थानच्या विश्वस्त आणि २,५०० मुलींच्या संसाराला कन्यादानातून आधार देणारे सेवाभावी व्यक्तिमत्त्व काही व्यक्ती आपल्या पदामुळे मोठ्या होतात, तर काही व्यक्ती आपल्या कार्यामुळे आणि माणुसकीच्या स्वभावामुळे लोकांच्या हृदयात कायमचे स्थान निर्माण करतात. कै. सौ. सुमित्रा काकी कैलास बापू कोते पाटील हे असेच एक प्रेमळ, सेवाभावी आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने केवळ कोते पाटील आणि कदम परिवारावरच नव्हे, तर शिर्डीच्या सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रावरही दुःखाची छाया पसरली आहे. अल्पशा आजाराने दिनांक २ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांचे निधन झाले आणि एका प्रेमळ, कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाचा जीवनप्रवास थांबला.



शिर्डी हे जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र. याच शिर्डीच्या सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सुमित्रा काकी यांचे माहेर कोपरगाव तालुक्यातील रावंदे येथील कदम परिवार. एका सुसंस्कृत कुटुंबात झालेली त्यांची जडणघडण आणि त्यानंतर शिर्डीच्या कोते पाटील परिवारात झालेले आगमन, हे जणू दुधात साखर मिसळल्याप्रमाणे होते. माहेरचे संस्कार आणि सासरच्या परिवाराची सामाजिक प्रतिष्ठा यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पाहायला मिळाला. त्यांनी दोन्ही परिवारांतील नाती केवळ जपली नाहीत, तर आपल्या प्रेमळ स्वभावाने ती अधिक घट्ट केली.

सुमित्रा काकी यांच्या सार्वजनिक जीवनातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा म्हणजे शिर्डी नगरपरिषदेच्या प्रथम महिला नगराध्यक्षा म्हणून त्यांची झालेली निवड. शिर्डी नगरपरिषदेचे प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून कैलास बापू कोते पाटील यांनी इतिहास घडविला, तर त्याच सार्वजनिक परंपरेत सुमित्रा काकी यांनी प्रथम महिला नगराध्यक्षा म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात शिर्डीच्या पायाभूत सुविधा आणि नागरी विकासाला महत्त्वपूर्ण चालना मिळाली. शिर्डीच्या वाढत्या लौकिकाला आणि भाविकांच्या वाढत्या संख्येला अनुरूप नागरी सुविधांच्या उभारणीत त्यांनी योगदान दिले. सार्वजनिक पद हे केवळ प्रतिष्ठेचे नसून जनसेवेचे माध्यम आहे, याची जाणीव त्यांच्या कार्यातून दिसून येत होती.

शिर्डीचे धार्मिक महत्त्व आणि देश-विदेशातून येणाऱ्या साईभक्तांची श्रद्धा लक्षात घेता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या माध्यमातून कार्य करण्याची संधी त्यांना मिळाली. संस्थानच्या विश्वस्त म्हणून त्यांनी साईभक्त, स्थानिक नागरिक, ग्रामस्थ, कर्मचारी आणि संस्थेच्या हिताशी संबंधित विविध घटकांशी आपुलकीचे नाते जपले. संस्थानच्या कार्यात सहभागी होताना भाविकांची सेवा आणि स्थानिकांच्या प्रश्नांबद्दलची संवेदनशीलता त्यांनी जपली. धार्मिक क्षेत्रातील जबाबदारी आणि सार्वजनिक जीवनातील अनुभव यांचा उपयोग समाजहितासाठी करण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय होता. त्यांच्या सामाजिक कार्याचा सर्वांत हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी पैलू म्हणजे साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून गेल्या पंचवीस वर्षांपासून सुरू असलेले विनामूल्य विवाहकार्य. या उपक्रमातून सर्व जाती-धर्मांतील सुमारे २,५०० मुलींचे विवाह विनामूल्य पार पाडण्यात आले. आजच्या काळात विवाह समारंभाचा वाढता खर्च अनेक सामान्य कुटुंबांसाठी मोठे आव्हान ठरत असताना, या उपक्रमाने हजारो कुटुंबांना मोठा आधार दिला. विशेष म्हणजे या कार्यात जात, धर्म किंवा आर्थिक परिस्थिती असा कोणताही भेदभाव न ठेवता सर्वांना समानतेने मदतीचा हात देण्यात आला.





एखाद्या मुलीचे लग्न पार पाडणे म्हणजे केवळ एक सामाजिक विधी पूर्ण करणे नव्हे, तर एका कुटुंबाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाच्या क्षणी त्यांच्या पाठीशी उभे राहणे होय. सुमित्रा काकी आणि त्यांच्या परिवाराला सुमारे २,५०० मुलींच्या कन्यादानाचे पुण्य लाभले, ही त्यांच्या जीवनकार्याची अत्यंत मोठी आणि अभिमानास्पद कमाई म्हणावी लागेल. या विवाहांमधून उभे राहिलेले हजारो संसार आणि त्या कुटुंबांच्या मनात निर्माण झालेली कृतज्ञतेची भावना हाच त्यांच्या सामाजिक कार्याचा खरा गौरव आहे. संपत्तीचा उपयोग समाजातील गरजू घटकांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्यासाठी कसा करता येतो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

सार्वजनिक जीवनात अनेक जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा आणि माणुसकी कधीही सोडली नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्न हास्य, बोलण्यातला गोडवा, प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधण्याची वृत्ती आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा स्वभाव यामुळे त्या प्रत्येकाच्या मनात आपलेपणाचे स्थान निर्माण करीत. पद, प्रतिष्ठा आणि सामाजिक कार्य यापलीकडे जाऊन माणसांशी नाते जोडण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यांच्याशी झालेली प्रत्येक भेट मनात एक आपुलकीची आठवण ठेवून जायची.

आमच्यासारख्या नातलगांसाठी त्या केवळ परिवारातील ज्येष्ठ व्यक्ती नव्हत्या, तर प्रेम, माया आणि आपलेपणाचा आधार होत्या. माहेर आणि सासर अशा दोन्ही परिवारांतील प्रत्येकाशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जपले. त्यांच्या सहवासातील आठवणी, त्यांनी दिलेले प्रेम आणि वेळोवेळी व्यक्त केलेली माया यांचे मोल शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. आज त्या आपल्यात नसल्या, तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुगंध आणि त्यांनी निर्माण केलेली माणुसकीची नाती कायम स्मरणात राहतील.

शिर्डीच्या विकासासाठी केलेले सार्वजनिक कार्य, श्री साईबाबा संस्थानच्या माध्यमातून केलेली सेवा, साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून हजारो कुटुंबांना दिलेला आधार आणि परिवारातील नाती जपण्याची त्यांची वृत्ती, हा त्यांच्या जीवनकार्याचा समृद्ध वारसा आहे. त्यांच्या पश्चात पती कैलास बापू कोते पाटील, पुत्र योगिराज आणि धनराज तसेच कोते पाटील परिवारातील सर्व सदस्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखद प्रसंगी कदम आणि कोते पाटील या दोन्ही परिवारांच्या दुःखात आम्ही मनापासून सहभागी आहोत. कै. सौ. सुमित्रा काकी कोते पाटील यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन! त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो आणि कोते पाटील व कदम परिवाराला हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो, ही श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थना.

या दुःखद प्रसंगी औताडे पाटील परिवार तसेच सहकारमहर्षी गणपतराव रभाजी औताडे पाटील शिक्षण संस्थेचे सर्व सभासद, सदस्य, पदाधिकारी, कर्मचारी व अधिकारी आणि पोहेगाव नागरी सहकारी संस्थेचे सर्व सभासद, सदस्य, पदाधिकारी, कर्मचारी व अधिकारी हे कदम व कोते पाटील परिवाराच्या दुःखात सहभागी आहेत.

भावपूर्ण श्रद्धांजली!
नितीनराव औताडे पाटील
संस्थापक व अध्यक्ष,
गणपतराव रभाजी औताडे पाटील
सामाजिक व शैक्षणिक मंडळ, पोहेगाव.
संस्थापक, पोहेगाव नागरी सहकारी संस्था मर्यादित, कोपरगाव.



क्षणो क्षणी आमच्या मनी तुमची आहे आठवण हीच आमच्या आयुष्यातील अनमोल साठवण...

शिर्डी शहराच्या प्रथम महिला नगराध्यक्षा व मा.विश्वस्थ-श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी

कै.सौ.सुमित्रा (काकी) कैलासबापू कोते पा.

यांना सोमवार दि.०२/११/२०२६ रोजी देवाज्ञा झाली, तरी त्यांचा

।। दशक्रिया विधी ।।

बुधवार दि.११/११/२०२६ रोजी सकाळी ०८.०० वा.

ठिकाण : कैलास बापू कोते पा. यांच्या राहत्या घरी, नगर-मनमाड रोड, जनेश्वर मंदिरा शेजारी, शिर्डी येथे होईल.

शोकाकुल

श्री.कैलासबापू गोविंदराव कोते पा.

श्री.प्रभाकर गोविंदराव कोते पा.
श्री.डॉ.रमेश गोविंदराव कोते पा.
श्री.योगराज कैलासबापू कोते पा.
श्री.धनराज कैलासबापू कोते पा.
श्री.महेंद्र बाबुराव कोते पा.
श्री.प्रशांत गोवर्धन कोते पा.
श्री.हरिश्चंद्र (सचिन) प्रभाकर कोते पा.

श्री.यादवराव बाबुराव कोते पा.
श्री.भागवतराव विठोबा कोते पा.
श्री.दिलीप गोवर्धन कोते पा.
श्री.विलास यादवराव कोते पा.
श्री.राजेंद्र यादवराव कोते पा.
श्री.रविंद्र गोवर्धन कोते पा.
श्री.विनोद गोवर्धन कोते पा.

श्री.बाजीराव चांगदेव कदम (भाऊ) रवांदा
सौ.सुलोचनाताई प्रभाकर कोते (जाव)
सौ.शिलाताई रमेश कोते (जाव)
सौ.चित्रामाई विठ्ठलराव गायकवाड (बहीण) आश्वी
श्रीमती.प्रमिलाताई एकनाथराव आहेर (नणंद) श्रीरामपूर
सौ.योजनाताई आबासाहेब हराळ (नणंद) पुणे
सौ..संगीताताई संजयराव दळवी (नणंद) नाशिक
सौ.हर्षदा अमोल औताडे (मुलगी) पोहेगाव
सौ.सुप्रिया निलेश नवले (पुतणी)
सौ.प्रांजली किरण वेताळ (पुतणी) पाथरे
कु.सुनीता रमेश कोते (पुतणी)
सौ.सुलक्षणा हरिश्चंद्र कोते (सून)
सौ.कंचन योगराज कोते (सून)
सौ.श्रावणी धनराज कोते (सून)

भावपूर्ण श्रद्धांजली

समस्त कोते पा. परिवार



सदर प्रसंगी ह.भ.प. उद्धव महाराज मंडलीक यांचे प्रवचन होईल.

पान १ वरुन

नोटाबंदीला १० वर्षे...

आणि त्यानंतर जिल्हा बँकांच्या तिजोरीत जमा झालेल्या जुन्या नोटांचा मोठा आर्थिक पेच निर्माण झाला. आज दशकभरानंतरही अहमदनगर जिल्हा बँकेचा कोट्यवधींचा निधी वापराविना पडून असल्याने सहकार क्षेत्रात नाराजी व्यक्त होत आहे. नोटाबंदीच्या काळात जिल्हा बँकांनी शेतकरी, सभासद आणि खातेदारांकडून जुन्या नोटा स्वीकारल्या होत्या. मात्र, या नोटा बदलून देण्यास रिझर्व्ह बँकेने नकार दिल्याने जिल्हा बँकांसमोर मोठे संकट उभे राहिले. या निर्णयाविरोधात बाधित जिल्हा बँकांनी न्यायालयीन लढा दिला. सर्वोच्च न्यायालयातही दाद मागण्यात आली; मात्र अपेक्षित दिलासा न मिळाल्याने हा प्रश्न प्रलंबितच राहिला.दहा वर्षांपूर्वीच्या नोटाबंदीचा निर्णय इतिहासजमा झाला; मात्र त्यातून निर्माण झालेला आर्थिक तिढा अहमदनगर जिल्हा बँकेच्या तिजोरीत आजही कायम आहे. दहा वर्षे उलटूनही ११.७० कोटींच्या नोटांना मोकळा श्वास कधी मिळणार? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ११ कोटी ७० लाख रुपयांची जुनी चलनी नोटांची रक्कम गेल्या दहा वर्षांपासून अडकून पडली आहे. कागदोपत्री असलेली ही रक्कम प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारात वापरता येत नसल्याने बँकेच्या निधी व्यवस्थापनावर त्याचा परिणाम झाला आहे. या रकमेचा विनियोग झाला असता तर बँकेच्या आर्थिक व्यवहारांना निश्चितच हातभार लागला असता. न्यायालयीन प्रक्रियेतून अपेक्षित मार्ग निघाल्यानंतर राज्यातील बाधित जिल्हा बँकांनी एकत्र येत केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्याकडे संयुक्त प्रस्ताव पाठविल्याची माहिती आहे. जुन्या नोटांच्या बदल्यात रक्कम मिळावी, यासाठी सहकार क्षेत्राकडून केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे आता केंद्र सरकार यावर कोणता निर्णय घेते, याकडे अहमदनगर जिल्हा बँकेचे लक्ष लागले आहे.

फटायांच्या पैशांच्या वादातून तरुणाचा बळी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (८ नोव्हेंबर) रात्री साडेदहाच्या सुमारास टिळकनगर येथील कामगार चौक परिसरात ही घटना घडली. मोईनुद्दीन शकील पठाण यांच्या फटायांच्या दुकानावर आरोपी सागर राहुल गुंजेकर, अक्षय ऊर्फ आकाश राहुल गुंजेकर, आनंद अमर पवार, अमित रविकांत पटारे, उमर शेख व त्यांचे साथीदार स्विफ्ट डिझायर कारमधून आले होते. फटायांच्या पैशांची मागणी केल्यानंतर आरोपींनी पैसे देण्यास नकार दिला. यावेळी वाद वाढला आणि आरोपींनी धमकी देत तेथून निघून गेल्याचा आरोप आहे. काही वेळाने हेच आरोपी पुन्हा घरासमोर आले. हातात शस्त्रे घेऊन शिवीगाळ करत त्यांनी परिसरात दहशत निर्माण केली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, सागर गुंजेकर याच्याकडे कुऱ्हाड, अक्षय गुंजेकर व उमर शेख यांच्याकडे तलवार, तर आनंद पवार आणि अमित पटारे यांच्याकडे चाकू होते. यावेळी सागर गुंजेकर याने अमित पटारे याला कार अंगावर घालण्यास सांगितले. त्यानुसार अमित पटारे याने स्विफ्ट डिझायर कार दोन वेळा शफी नवाब पठाण यांच्या अंगावर घातली. त्यात गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०८९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील खुनासह विविध कलमांनुसार तसेच शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच सहायक पोलिस निरीक्षक चेतन लोखंडे यांनी तपास पथकाला तातडीने हालचाली करण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांनी तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे अमित रावसाहेब कोळगे (रा. दत्तनगर, श्रीरामपूर) आणि अक्षय ऊर्फ आकाश राहुल गुंजेकर (रा. रांजनखोल, ता. राहाता) यांना अटक केली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

दिवाळीच्या रात्री श्रीरामपूरमध्ये दगडफेक

अपघातानंतर जमलेल्या युवकांनी वाहनावर दगडफेक करून मारहाण केल्याचा आरोप केला आहे. तसेच अल्तमश अश्पाक शेख याला जखमी करून एमएच-२३ वाय-०००१ क्रमांकाची शेवरलेट क्रूझ कार पेटवून दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात दोन्ही गटांच्या तक्रारींवरून परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्हा क्रमांक १०८६/२०२६ आणि १०८७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सहायक पोलिस निरीक्षक चेतन लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तांत्रिक माहिती व गोपनीय तपासाच्या आधारे कारवाई केली. एका गुन्ह्यात श्रीकांत गावडे, अनिकेत डफळ, तेजस मोरे, साहिल पाटेकर आणि राज चव्हाण, तर दुसऱ्या गुन्ह्यात अरबाज अन्वर शेख, मोसीन मुश्ताक शेख आणि अरबाज रफीक देशमुख यांना अटक करण्यात आली.

उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून, परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी बंदोबस्त वाढविला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक चेतन लोखंडे, पोलीस उपनिरीक्षक राम शिखरे, रोशन निकम, विशाल लहाणे व त्यांच्या पथकाने केली.

ऐन दिवाळीत बळीराजा रस्त्यावर!

राज्य उपाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी केला.शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत माघार घेणार नाही, असा निर्धार शेतकरी नेते ॲड. अजित काळे यांनी व्यक्त केला. प्रकाश देठे यांनीही कारखानदारांनी तातडीने दर जाहीर न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला. या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटना, शरद जोशी विचार मंच, रयत क्रांती संघटना, प्रहार जनशक्ती, शिवसेना (शिंदे गट), वंचित बहुजन आघाडी आणि मराठा एकीकरण समितीसह विविध संघटना सहभागी झाल्या आहेत.दरम्यान, आंदोलनामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात आहे. ऊसाला चार हजारांचा भाव जाहीर होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी केल्याने हा संघर्ष आणखी तीव्र होण्याची शयता आहे.

शिवसेनेने दुष्काळाच्या संकटात आदिवासी कुटुंबांची दिवाळी गोड आ. खताळ यांचा मदतीचा हात

येठेवाडी, काटवणवाडी व दुबेवाडी या वाड्या-वस्त्यांवर स्वातंत्र्यानंतरही वीजपुरवठ्याची सुविधा उपलब्ध झाली नव्हती. तालुक्यात परिवर्तन झाल्यानंतर या भागातील वीजपुरवठ्यासाठी आवश्यक असलेली विद्युत रोहित्रे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. ही रोहित्रे तातडीने कार्यान्वित करून वीजपुरवठा सुरू करण्याच्या सूचना महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे लवकरच या वस्त्यांमधील अंधार दूर होऊन नागरिकांच्या जीवनात प्रकाश निर्माण होईल.

अमोल खताळ, आमदार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : संगमनेर तालुक्यात यंदा दुष्काळाचे गंभीर संकट निर्माण झाले असून, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी कामगार तसेच आदिवासी पाड्यांवरील गोरगरीब कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. अशा कठीण परिस्थितीतही गोरगरीब कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या सामाजिक बांधिलकीतून शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार अमोल खताळ यांनी कर्जुले पठार येथील येठेवाडी, गुंजाळवाडी पठार येथील काटवणवाडी तसेच डोळासणे येथील दुबेवाडी परिसरातील आदिवासी व



गरजू कुटुंबांना दिवाळी शिधा, साड्या, मिठाई आणि फटाक्यांचे वाटप केले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत वंचित आणि गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्यात आला.

राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि गोरगरीब कुटुंबांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र महायुती सरकार सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. दुष्काळाच्या संकटात शासनाच्या मदतीसोबतच समाजातील प्रत्येक घटकाने गरजू कुटुंबांना सहकार्य करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपापल्या परीने मदतीचा हात पुढे केल्यास संकटग्रस्त कुटुंबांना मोठा आधार मिळू शकतो असे आवाहन आ. खताळ यांनी केले.

यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रणजित ढेरंगे, भाजपचे तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, भाजप नेते किरण भागवत कर्जुले पठारचे माजी सरपंच रवींद्र भोर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांसोबत साजरी माणुसकीची दिवाळी

आळेफाटा : आम्ही जुन्नरकर रहिवासी संघ, पुणे व पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांसोबत 'दिवाळी स्नेह उपक्रम' उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत राजाराम पाटील वृद्धाश्रम,



बल्लाळवाडी येथे २ पेशंट कॉट, २ इन्व्हर्टर बॅटरी, १ ऑफिस टेबल, १ कराओके स्पीकर व किराणा साहित्य भेट देण्यात आले. तर दिव्यांग कला विकास केंद्र संचालित नंदनवन संस्था, जुन्नर येथे दिव्यांग बांधवांसाठी विशेष 'दिवाळी किराणा बाजार' आयोजित करून किराणा साहित्य व दिवाळी भेटवस्तू देण्यात आल्या.यावेळी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांशी स्नेहसंवाद साधून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचा प्रयत्न करण्यात आला. फटाक्यांच्या आतषबाजीपेक्षा माणुसकीची उजळणीच खरी दिवाळी असल्याची भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली.

या उपक्रमासाठी संघाचे मार्गदर्शक कमलाकर गुंजाळ, अध्यक्ष अभिजित कुऱ्हाडे, उपाध्यक्ष तुषार पाचपुते, खजिनदार रमेश हांडे, सचिव अतुल शिंगोटे, संजय केदारी, अमोल घोलप, सुमित शिंदे, ओंकार चव्हाण, शुभांगी महाबरे, नीलम शिंदे व सर्व सभासदांनी विशेष सहकार्य केले. ''ज्येष्ठांचा आशीर्वाद आणि दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावरील आनंद, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी!'' अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली.

अंमली पदार्थ तस्करीविरोधात कारवाई ! गांजा विक्रीप्रकरणी दोघांना अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कवठे येमाई : शिरूर शहरात अंमली पदार्थांची अवैध विक्री व तस्करी करणाऱ्यांविरोधात शिरूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. मार्केट यार्डच्या मागील बाजूस असलेल्या साईनगर परिसरात छापा टाकून गांजा विक्रीप्रकरणी दोन तरुणांना अटक करण्यात आली आहे. तर या प्रकरणातील मुख्य आरोपी आशुतोष मिलिंद काळे हा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री पावणे कराच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. यामध्ये उत्कर्ष जालिंदर ढेरे (वय २१, रा. बाभुळसर खुर्द, ता. शिरूर) आणि साई संतोष ससाणे (वय २०, रा. हुडको कॉलनी, शिरूर) या दोघांना पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी केलेल्या तपासात मुख्य आरोपी आशुतोष काळे याने स्वतःच्या राहत्या घरात गांजा साठवून ठेवला होता. त्यापैकी काही गांजा विक्रीसाठी उत्कर्ष ढेरे व साई ससाणे यांच्याकडे दिल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी घराची व संबंधित ठिकाणांची तपासणी करून मोठ्या प्रमाणात गांजा आणि इतर साहित्य जप्त केले.या कारवाईत आशुतोष काळे याच्या घरातून १ किलो ८०९ ग्रॅम, उत्कर्ष ढेरे याच्याकडून १२२ ग्रॅम, साई ससाणे याच्याकडून ८० ग्रॅम, तर ॲक्टिव्हा मोटारसायकलच्या डिक्कीतून ४०३ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. याशिवाय दोन आयफोन, एक वनप्लस मोबाईल, गांजा पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या ९९ रिकाम्या प्लास्टिक पिशव्या आणि वजनकाटा हस्तगत करण्यात आला.

या कारवाईत एकूण २ किलो ४१४ ग्रॅम गांजासह सुमारे २ लाख ७१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांना अटक करण्यात आली असून फरार मुख्य आरोपीचा शोध सुरू आहे. ही कारवाई शिरूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विनोद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव भोसले व त्यांच्या पथकाने केली. पोलीस कॉन्स्टेबल ए. एस. माने यांनी फिर्याद दिली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक टेंगले करीत आहेत.अंमली पदार्थांच्या अवैध विक्री व तस्करीला आळा घालण्यासाठी शिरूर पोलिसांनी उचललेल्या या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अशा अवैध धंद्यांबाबत नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी,असे आवाहन शिरूर पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

निधनवार्ता

रमेश पटारे



